# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 05/03/2020 (गुरूवार)
# (सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 13 कि.मी. अंतरावरील मेटपांजरा शिवार काटोल नागपूर रोड येथे दिनांक 03/03/2020 चे 22:00 वा. ते 23:23 वा. एक अनोळखी वेडसर इसम वय अंदाजे 45 ते 50 वर्ष हा रॉग साईडने ताराबोरी कडुन मेटपांजरा कडे पायदळ जात होता. दरम्यान अवतार मेहरबाबा आश्रम जवळ रोडच्या मध्य भागी मेटपांजरा कडुन ताराबोरी कडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाने इसमास धडक दिली. या अपघातात अनोळखी इसमाचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री. सुरेश लांडे 7769824787 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील मौजा पारशिवनी ते खापा रोड पंजाब खैरी येथे दिनांक 04/03/2020 चे 17:00 वा. दरम्यान एमएच–49/एएम–2846 क्रमांकाच्या ड्रिम युगा मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– अनिल शालीकराम मुळे, वय 30 वर्ष, रा. पंचशिल नगर, नागपुर याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकलवर ट्रिपल सिट बसवुन मोटरसायकला भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित डिवायडरला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक अनिल मुळे हा स्वतः जखमी झाला. तर मोटरसायकल वर बसलेले सोबती 1) सौ.कल्याणी अनिल मुळे, वय 20 वर्ष, रा. पंचशिल नगर, नागपुर व 2) कु. निकीता मनोज कावळे, वय 20 वर्ष, रा. पाटणसावंगी हे जखमी झाले. तर मोटरसायकल वरील लहान मुलगी तृप्ती अनिल मुळे, वय 15 महिने हिला मार लागुन गंभीर जखमी होवुन तिचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. हर्षल एकरे 8329445270 हे करीत आहे.

3) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावरील मौजा गांगनेर रेल्वे फाटक जवळ कन्हान येथे दिनांक 05/09/2019 चे 14:00 वा. ते 14.30 वा. दरम्यान 1) रविद्र येळने व 2) शालीकराम विश्वकर्मा हे रेल्वे लाईनवर काम करीत होते. दरम्यान आरोपी नामे– सुरेन्द्र गोंधनलाल शेन्द्रे (रेल्वे ठेकेदार), वय 48 वर्ष, रा. न्यु लक्ष्मीनगर, रिंगरोड गोंदिया याच्या निष्काळजीपणा मुळे रेल्वेलाईनवर वरील काम करणाऱ्या 1) रविद्र येळने व 2) शालीकराम विश्वकर्मा दोन्ही इसमाचा ट्रेनच्या धडकेने मृत्यू झाला. मर्गच्या तपासामध्ये सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पाली 9011038677 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर